# विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

**अभिवेदन** (Representation) **क्रमांक ४४ / २०२४**

कृषीपंप वीज जोडणी बंद करणेबाबत

तानाजी कृष्णा पवार ........................................ अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, फलटण (महावितरण) .................... प्रतिवादी १

अंकुश कृष्णा पवार .................... प्रतिवादी २

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- अजित तानाजी पवार, प्रतिनिधी

प्रतिवादी १ तर्फे :- प्रदिप ग्रामोपध्याय, कार्यकारी अभियंता, फलटण
जा.ग. कुंभार, उपकार्यकारी अभियंता

प्रतिवादी २ तर्फे : अंकुश कृष्णा पवार

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १४ मार्च २०२४

आदेश पारित दिनांक :- ३० एप्रिल २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०20 (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०20) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, बारामती परिमंडल, (मंच) यांच्या दिनांक १७ जानेवारी २०२४ च्या आदेशाविरुध्द अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी दाखल केले.

२. मंचाने तक्रारदार तानाजी कृष्णा पवार यांनी अंकुश कृष्णा पवार यांची कृषीपंप वीज जोडणी बंद करण्या बाबतचे गाऱ्हाणे (क्रमांक १७/२०२३) दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर

केले. मंचाने जारी केलेल्या त्यांच्या आदेशात नमुद केले की, श्री. अंकुश कृष्णा पवार यांच्या नावे देण्यात आलेली कृषीपंप (ग्राहक क्रं.२०३३३००३२२९२) वीज जोडणी ही महावितरणच्या नियमांना अधीन राहून दिली आहे. याच विषया संदर्भातील तक्रारदार तानाजी कृष्णा पवार यांची तक्रार (दिवाणी दावा रे.दि.मु.न. १५४/२०२३) न्यायालयात प्रलंबित आहे, म्हणून सदर तक्रार ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२० मधील विनियम ७.९ अन्वये नामंजूर केली.

३. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १४ मार्च २०२४ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थीने नमुद केले की, ते मुक्काम पोष्ट भोळी, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा येथील शेती ग्राहक (क्रं.२०३३३०००२७१७) आहेत. अपिलार्थी यांची गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ या त्यांच्या मिळकतीच्या बांधावर मालकी हक्काची विहीर आहे. सदर विहीरीचा काही भाग हा गट क्रं.२५४ मध्ये येत आहे. गट क्रं.२५३ ही मिळकत अपिलार्थी व प्रतिवादी २ यांनी मिळून खरेदी केलेली आहे. तसेच, गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ या मिळकतीमध्ये खरेदी केल्यानंतर सरस व निरस मनाने तोंडी वाटप झालेले आहे. गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ ची वहीवाट ही पूर्व-पश्चिम आहे. गट क्रं.२५३ या मिळकतीच्या पुर्वेकडील बाजूस अपिलार्थीना आडवे क्षेत्र दिलेले आहे तर प्रतिवादी २ यांना पश्चिमेकडील बाजूस आडवे क्षेत्र दिलेले आहे; तर, अपिलार्थीना दिलेल्या क्षेत्रामध्ये अपिलार्थी यांनी सन १९९५ साली स्वखर्चाने विहीर खणली आहे व त्या विहिरीवर त्यांनी मोटरपंप बसविलेला आहे. सदर विहिरीबाबत अपिलार्थीच्या विरुध्द मा. तहसीलदार सो.खंडाळा यांच्या कडे दिनांक ३० ऑगष्ट १९९५ साली तक्रार दाखल केली आहे.

- गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ मध्ये अपिलार्थीनी त्यांच्या हिस्याला आलेल्या जागेत स्वतंत्र विहीर खणलेली आहे. गट क्रं.२५४ मध्ये अपिलार्थीच्या नावे विहीर पडीची नोंद लागलेली नसून, तसेच ती गट क्रं.२५३ मध्ये अपिलार्थीच्या नावे विहिर पडीची नोंद झालेली नाही. याचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी २ यांनी सन २०२३ मध्ये स्वतः मोबाईलच्या आधारे विहीर पड क्षेत्राची नोंद लावून तथाकथीत वीज जोडणी घेतलेली आहे.

- सन २०१५ साली अपिलार्थीने स्वखर्चाने सदर विहीरीतील गाळ काढून पुन्हा खोदकाम करून सिमेंट कॉंक्रीटचे रिंग टाकण्याचे काम केले असून सदर विहिरीवर दिनांक १४ ऑगष्ट २०१५ रोजी ३ एचपी चे कनेक्शन देखील घेतलेले आहे, तथापि प्रतिवादी २ मोटरपंपाद्वारे पाणी उपसा व सिंचनाचा लाभ घेत आहेत.

➢ प्रतिवादी २ यांची सदर गटामध्ये त्यांच्या मालकीची विहीर नसतानाही त्यांनी महावितरणकडे अर्ज करून जोडणी घेण्याचा प्रयत्न केला. महावितरणकडून सदर विहीरीवर वीज जोडणी करीता आले असता अपिलार्थीने सदर विहिरीवर वीज जोडणी देऊ नये म्हणून लेखी तक्रार, शाखा कार्यालय वाठार येथे दिनांक १६ मार्च २०२३ रोजी दिली. सदर वीज जोडणी घेताना प्रतिवादी २ यांनी विहिरीबाबतची कागदपत्रे वा विहीरीच्या मालकी हक्काची कागदपत्रे जोडली नसून सदर गटातील सहधारकांची परवानगी देखील घेतलेली नाही.

➢ प्रतिवादी २ यांनी सदर विहीरीवर दिनांक १ मे २०२३ रोजी घेतलेली वीज जोडणी बेकायदेशीर असून विहीरीमध्ये बसविलेल्या पंपामार्फत पाणी उपसा करीत आहेत त्यामुळे अपिलार्थींना त्यांच्या पिकांना पुरेसे पाणी देता येत नाही. परिणामी अपिलार्थींच्या पिकाचे नुकसान होत आहे.

➢ अपिलार्थीने दिनांक ३१ ऑगष्ट २०२३ रोजी प्रतिवादी २ यांची वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत करावी याकरीता तक्रार दाखल केली. मंचाने सदर तक्रार नामंजूर करताना प्रतिवादी २ यांना वीज जोडणी नियमानुसार दिली आहे असे आदेश दिले.

➢ अपिलार्थीने नमुद केले की, प्रतिवादी २ यांना बनावट व फेरफार कागदपत्रांच्या आधारे अनाधिकृत वीज पुरवठा दिला. म्हणून खंडाळा येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात (रे.दि.मु.न. १५४/२०२३) दावा दाखल केला, त्यामुळे मुळ तक्रारीला बाधा येत नाही. तसेच, अपिलार्थीची तक्रार ही विनियम ग्राहक गाऱ्हाणे विनियम ७.९ मध्ये येत नाही. तरीसुध्दा मंचाने त्या विनिमयाचा आदेशात उपयोग केला ही खेदाची बाब आहे. गाऱ्हाण्याच्या कळीचा मुळ मुद्दा प्रतिवादी २ यांनी ३ एचपी कृषीपंपाकरीता वीज जोडणी घेतली या कारणास्तव दावा दाखल केला. बेकायदेशीर कारवायांवर काहीही कृती न करता महावितरण बेजबाबदारपणे वागले आहे, ही बाब निषेधार्ह आहे.

➢ मंचाच्या आदेशाने समाधान झाले नाही, म्हणून अपिलार्थींनी दिनांक २३ जानेवारी २०२४ रोजी मा. विद्युत लोकपाल मुंबई यांचे कार्यालयात अभिवेदन दाखल केले. प्रतिवादी २ यांना दिलेली वीज जोडणी कायमस्वरूपी खंडीत करण्यात यावी, अशी मागणी अभिवेदनाद्वारे अपिलार्थीने केली आहे.

४. प्रतिवादी क्रं.१ महावितरणने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १४ मार्च २०२४ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

- प्रतिवादी क्रं.१ ने नमुद केले की, श्री. अंकुश कृष्णा पवार यांनी शेतीपंपासाठी गट क्रं.२५४ मध्ये दिनांक ३ ऑगष्ट २०२२ रोजी वीज जोडणीचा अर्ज केला होता. परंतू, सदर गटामध्ये विहीरीची नोंद नसल्यामुळे, शाखा कार्यलिय वाठार कॉलनी कार्यालियाने सदर अर्ज नामंजूर केला. त्यांनतर दिनांक २८ मार्च २०२३ रोजी श्री. अंकुश कृष्णा पवार यांनी गट क्रं.२५३ मधील विहीरीवर शेतीपंपासाठी वीज जोडणीचा अर्ज केला. सदर अर्जासोबत जोडलेल्या सात-बारा चे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, श्री. अंकुश कृष्णा पवार यांचे नाव फेरफार नोंद नं.९१८ चे भोगवटादार सदरी नमुद आहे, तसेच, जलसिंचनाचे साधन म्हणून विहिरीची नोंद असल्याचे आढळते. सर्व नियमाचे पालन करून दिनांक १ मे २०२३ रोजी प्रतिवादी क्रं.२, श्री. अंकुश कृष्णा पवार यांना ३ एचपी कृषीपंपाचे कनेक्शन (ग्राहक क्रं.२०३३००३२२९२) देण्यात आले.

- श्री. अंकुश कृष्णा पवार यांनी दिनांक ७ जून २०२३ रोजीचे रू.१००/- च्या जनरल स्टँप पेपरवर सादर केलल्या हमीपत्रावर नमुद केले की, भविष्यात त्यांचे नावे वीज जोडणी दिल्यास कोणतीही तक्रार / हरकत आल्यास त्याची जबाबदारी ही सर्वस्वी श्री. अंकुश कृष्णा पवार यांची राहील.

- अपिलार्थी तानाजी कृष्णा पवार यांनी श्री. अंकुश कृष्णा पवार यांच्या नावे देण्यात आलेली वीज जोडणी बेकायदेशीरपणे देण्यात आलेली असून ती खंडीत करण्यात यावी; म्हणून मंचाकडे तक्रार दाखल केली, तसेच, विद्युत लोकपाल (मुंबई) न्यायासनाकडे श्री. अंकुश कृष्णा पवार यांची वीज जोडणी खंडीत करण्यात यावी, अशी विनंती केली. वास्तविक अपिलार्थीने श्री. अंकुश कृष्णा पवार यांच्या नावे देण्यात आलेल्या वीज जोडणीबाबत तक्रार दाखल केलेली नाही.

- श्री. तानाजी कृष्णा पवार यांनी श्री. अंकुश कृष्णा पवार यांच्या विरूध्द खंडाळा येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात रे.दि.मु.न. १५४/२०२३ नुसार केस दाखल केलेली आहे. सदरच्या दाव्यावरून असे निदर्शनास येते की, अपिलार्थींनी विद्युत लोकपाल (मुंबई) न्यायासनाकडे मागितलेली दाद न्यायप्रविष्ठ आहे. अशः परिस्थितीत सदर अपिल विचारात येणार नाही. तसेच, अपिलार्थी हे 'ग्राहक' या व्याख्येत बसत नाही. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम, २०20 मधील विनियम ९.७ मध्ये खालीलप्रमाणे तरतुदी आहेत.

*(सी) तक्रारदार म्हणजे अधिनियमाच्या कलम २(१५) मध्ये व्याख्या केलेला कोणताही ग्राहक आणि त्यामध्ये वितरण परवानाधारकाविरुध्द तक्रार किंवा गाऱ्हाणे किंवा अभिवेदन दाखल करणाऱ्या संभाव्य ग्राहकाचा समावेश होतो.*
*(डि) तक्रार म्हणजे वितरण परवानाधारकाने दिलेल्या वीज पुरवठयाच्या सेवेबाबत असमाधान व्यक्त करून ग्राहकाने केलेले निवेदन.*

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

*(इ) "'गाऱ्हाणे' म्हणजे वितरण परवानेधारकाने, परवाना, कंत्राट, करारान्वये किंवा विद्युत पुरवठा संहिता विनियमांतर्गत किंवा आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या वितरण परवानेधारकांच्या कृतीच्या मानकांच्या संबधात पार पाडण्याची हमी दिलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरूप, ती पार पाडण्याची पध्दत यामधील कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा; ज्यात इतर बाबींबरोबरच आयोगाने दिलेला कोणताही आदेश किंवा त्यांच्या अनुषंगाने करावयाची कोणतीही कृती याची पुर्तता न होण्याबाबतच्या गाऱ्हाण्यांचा समावेश होतो, जे मंच किंवा विद्युत लोकपालांच्या अधिकारक्षेत्राखाली येते, जसे असेल तसे;"*

- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लोकपाल विनियम २०२०) मधील विनियम ७.९ मध्ये नमुद केल्यानुसार मंच खालील तरतुदीनुसार गाऱ्हाणे नाकारेल.

*"ए) समान प्रकरण आणि समान तक्रारदार व परवानाधारक यांच्यामध्ये कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, लवाद किंवा अन्य कोणत्याही प्राधिकरणाकडे कार्यवाही प्रलंबित असेल, किंवा हुकूमनामा किंवा निकाल किंवा अंतिम आदेश आधीच अन्य अशा न्यायालय, न्यायाधीकरण, लवाद किंवा प्राधिकरणाकडून पारित करण्यात आलेला आहे;*

*बी) अधिनियमाच्या कलम १२६, १२७, १३५ ते १३९, १५२ आणि १६१ खाली येणारी प्रकरणे;*

*सी) कारवाईचे कारण उदभवण्याच्या दिनांकापासून दोन (२) वर्षाच्या नंतर तक्रार दाखल करण्यात आली असेल तर; आणि*

*डी) देयकाच्या रकमेबाबत वाद नसतो तेथे थकबाकीच्या वसुली प्रकरणी; आणि*

*इ) खालील गाऱ्हाण्यांच्या बाबतीतः*

*एक. शुल्लक, उपद्रवकारक, दृष्ट हेतूचे,*

*दोन. पुरेसे कारण नसलेले किंवा*

*तीन. जेव्हा तक्रारदाराला किंवा ग्राहकाला सकृतदर्शनी कोणतीही हानी किंवा नुकसान किंवा गैरसोय झालेली नसेल, ज्याचे प्रतिनिधीत्व एखादया संघटनेद्वारा किंवा ग्राहकांच्या गटामार्फत करण्यात येत असेल.*

*परंतू असे की, तक्रारदाराला त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणतेही गाऱ्हाणे नाकारण्यात येणार नाही."*

विद्युत लोकपाल मुंबई
म.वि.नि.आ.

- अपिलार्थीने मंचाकडे दिनांक ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी तक्रार दाखल केली. मंचाने दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजी दिलेला निर्णय परिच्छेद क्रं. २ मध्ये संदर्भीत केला आहे. तसेच, सदर तक्रार ही मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर खंडाळा यांचे न्यायालयात वडीलोपार्जीत जागेसंबधात वीज जोडणीबाबतचा दावा प्रलंबित आहे. त्यामुळे अपिलार्थीस श्री. अंकुश कृष्णा पवार यांच्या वीज जोडणीबाबत काही हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या सक्षम न्यायालयाकडे वा अन्य प्राधिकारण याकडे दाद मागावी.

- वरील सर्व बाबींचा उहापोह करता अपिलार्थींचे दाखल केलेले गाऱ्हाणे विनियम ७.९ अन्वये फेटाळण्यात यावे तसेच, या तक्रारीत अपिलार्थी हे स्वतःच्या वीज जोडणीबाबत तक्रार करू शकतात, इतरांची वीज जोडणी बंद करण्याबाबतची तक्रार 'ग्राहक' व 'गाऱ्हाणे' यांच्या व्याख्येत बसत नाही. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करता अपिलार्थींचे अभिवेदन फेटाळण्यात यावे अशी विनंती प्रतिवादींनी केली.

५. प्रतिवादी २ श्री. अंकुश कृष्णा पवार यांनी त्यांच्या निवेदनातील व दिनांक १४ मार्च २०२४ रोजीच्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- प्रतिवादी २ यांनी नमुद केले की, अपिलार्थींनी दाखल केलेली तक्रार वस्तुस्थिती दडवून ठेऊन केलेली असून खरी नाही. प्रतिवादी महावितरण फलटण विभागाने गट क्रं.२५३ या मिळकतीवर असलेल्या विहीरीवर वीज जोडणी दिली आहे. गट क्रं.२५३ या मिळकतीच्या ७/१२ वर श्री. अंकुश कृष्णा पवार यांचे खाते नं. ३८२ वर विहीरीची नोंद आहे. सदरची विहीर अपिलार्थी व प्रतिवादी २ यांनी गट क्रं.२५३ या मिळकतीवर खणलेली आहे. प्रतिवादी २ यांचा ग्राहक क्र.२०३३३००३२२९२ असा आहे. अपिलार्थीने मिळकतीबाबत वस्तुस्थिती दडवून ठेवलेली आहे. वादातीत विहीर गट क्रं.२५४ मध्ये नसून गट क्रं.२५३ मध्ये आहे. अपिलार्थीने गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ चा नकाशा जोडलेला नाही. अपिलार्थीने प्रतिवादी २ यांना दिलेल्या वीज जोडणीबाबत मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाने सदर तक्रार नामंजूर केली; म्हणून, अपिलार्थीने माननीय विद्युत लोकपाल यांच्याकडे तक्रार दाखल केली.

- गट क्रं.२५४ ही मिळकत तसेच, गट न. ३४२ व ३४९ या अपिलार्थी व प्रतिवादी २ यांचे भाऊ शिवाजी कृष्णा पवार यांच्या वडीलोपार्जीत मालकी वहीवाटीच्या मिळकती आहेत. अपिलार्थी व प्रतिवादी २ यांचे वडील कृष्णा पवार यांचे मुत्यूनंतर सदर मिळकतीवर शिवाजी कृष्णा पवार यांच्या नावाची नोंद झाली आहे. सदर वडीलोपार्जीत मिळकतीचे अपिलार्थी, प्रतिवादी २ श्री. अंकुश कृष्णा पवार व शिवाजी कृष्णा पवार यांच्यात निरसमनाने वाटप झालेले नाही. गट क्रं.२५३

ही मिळकत अपिलार्थी व प्रतिवादी २ ऱ्यांनी सामाईकपणे दिनांक १७ नोव्हेंबर १९९४ रोजी रजिष्टर खरेदीखताने गेणबा चव्हाण यांचेकडून खरेदी केली. गट क्रं.२५३ शेजारी असलेल्या गट क्रं.२५४ मध्ये पाण्याची सोय नव्हती, म्हणून अपिलार्थी व प्रतिवादी २ यांनी गट क्रं.२५३ मध्ये विहीर खणली. त्यानंतर अपिलार्थीने गट क्रं.२५३ मध्ये लबाडीने सदर विहिरीची नोंद गट क्रं.२५४ या मिळकतीत स्वतःच्या नावे करून घेतली. अपिलार्थी व प्रतिवादी २ हे सन २०११ पर्यंत सर्व शेती एकत्र करत होते. परंतू त्यांनतर अपिलार्थीने प्रतिवादी २ यांच्या हिस्स्याची शेती करण्यास असमर्थता दाखविली. प्रतिवादी २ हे वाटेकरींकडून शेती करून घेत होते. प्रतिवादी २ हे सन २०११ रोजी नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर, स्वतः शेती करू लागले. सुरवातील डिझेल इंजिनने पाणी उपसले जात होते त्यांनर सन २०१५ रोजी अपिलार्थीने त्यांच्या नावे सदर विहिरीवर वीज जोडणी घेतली व त्याच वर्षी विहिरीवर रिंग टाकण्याचे काम अपिलार्थी व प्रतिवादी यांच्या सामाईक खर्चाने केले. सदर वीज जोडणीचे वीज देयकांचा भरणा ही दोघे मिळून करत होते. माहे मार्च २०२२ पर्यत विहीरीच्या पाण्याच्या वापरावरून कोणतेच वाद नव्हते.

- प्रतिवादी २ यांनी विहिरीची नोंद सक्षम अधिकारी, महसुल विभाग यांच्याकडून रितसर गट क्रं.२५३ या मिळकतीच्या ७/१२ वर करून घेतलेली आहे. अपिलार्थीने महावितरणकडे प्रतिवादी २ यांच्या वीज जोडणीची तक्रार खोटी आहे, हे जेव्हा महावितरणच्या कर्मचाऱ्यांच्या लक्षात आले, तेव्हा त्यांनी प्रतिवादी २ यांस वीज जोडणी दिलेली आहे. अपिलार्थीने वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यावर दबाव आणण्याच्या हेतूने दिनांक १६ मार्च २०२३ रोजी नोटीस दिली. सदर नोटीसीमध्ये अपिलार्थीने जाणिवपूर्वक अपिलार्थीच्या जिवीतास धोका आहे, त्यास महावितरणचे अधिकारी जबाबदार आहेत व त्यांच्यावर फौजदारी कारवाई करण्याची भाषा वापरली. प्रतिवादी २ यांना वीज जोडणी दिल्यानंतर अपिलार्थीने महावितरणचे वायर कनेक्शन, डि.पी. बॉक्स पाईप, वायर, मोटर याचे मोडतोड करून आर्थिक नुकसान केले. तसेच प्रतिवादी २ यांच्या हत्येचाही प्रयत्न केला. याबाबत अपिलार्थीविरूध्द दिनांक १९ सप्टेंबर २०२३ रोजी शिरवळ पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे.

- प्रतिवादी २ यांनी विहिरीवर घेतलेली वीज जोडणी ही कायदेशीर मार्गाने घेतलेली आहे, त्यामुळे ती खंडीत करण्याचा प्रश्नच येत नाही. प्रतिवादी २ हे कायदेशीर हक्क व अधिकाराने विहिरीतील पाण्याचा उपसा करत होते व आजही करत आहेत. याबाबतचे प्रकरण दिवाणी न्यायालय कनिष्ठस्तर खंडाळा यांचे न्यायालयात रे.दि.मुं.नंबर १५४/२०२३ नुसार प्रलंबित आहे. सदर माहिती अपिलार्थीने लपवून ठेवली व तक्रार दाखल केली. त्यामुळे मंचाने दिलेला निर्णय योग्य व कायदेशीर आहे. सबब, मंचाचा निर्णय कायम करण्यात यावा व अपिलार्थी यांचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

म.वि.नि.आ.

विश्लेषण व निर्णय

६. दोन्ही पक्षकारांचे म्हणने ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन करण्यात आले.

७. अपिलार्थीने नमुद केले की, त्यांची गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ या त्यांच्या मिळकतीच्या बांधावर मालकी हक्काची विहीर आहे. सदर विहीरीचा काही भाग हा गट क्रं.२५४ मध्ये येत आहे. गट क्रं.२५३ ही मिळकत अपिलार्थी व प्रतिवादी २ यांनी मिळून खरेदी केलेली आहे. तसेच गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ या मिळकतीमध्ये खरेदी केल्यानंतर सरस व निरस मनान तोंडी वाटप झालेले आहे. गट क्रं.२५३ व गट क्रं.२५४ मध्ये अपिलार्थी यांच्या वाटयाला आलेल्या जागेत अपिलार्थींनी स्वतंत्र विहीर खणलेली आहे. गट क्रं.२५४ मध्ये अपिलार्थींच्या नावे विहीर पडीची नोंद लागलेली नाही तसेच गट क्रं.२५३ मध्ये अपिलार्थीच्या विहिर पडीची नोंद लागलेली नाही. प्रतिवादी २ यांनी सदर विहीरीवर बेकायदेशीरपणे वीज जोडणी दिनांक १ मे २०23 रोजी घेतलेली आहे व विहीरीमध्ये बसविलेल्या पंपामार्फत पाणी उपसा करीत आहेत. प्रतिवादी २ यांना बनावट व फेरफार कागदपत्रांच्या आधारे अनाधिकृत वीज पुरवठा दिला. म्हणून खंडाळा येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात (रे.दि.मु.न. १५४/२०23) दावा दाखल केला. सदर दावा प्रलंबित आहे.

७. प्रतिवादी क्रं.१ ने नमुद केले की, श्री. अंकुश कृष्णा पवार यांनी शेतीपंपासाठी गट क्रं.२५४ मध्ये दिनांक ३ ऑगष्ट २०२२ रोजी वीज जोडणीचा अर्ज केला होता. सर्व नियमाचे पालन करून दिनांक १ मे २०23 रोजी प्रतिवादी क्रं.२ श्री. अंकुश कृष्णा पवार यांना ३ एचपी कृषीपंपाचे कनेक्शन (ग्राहक क्रं.२०३३००३२२९२) देण्यात आले. श्री. तानाजी कृष्णा पवार यांनी श्री. अंकुश कृष्णा पवार यांच्या विरुध्द खंडाळा येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात रे.दि.मु.न. १५४/२०23 नुसार केस दाखल केलेली आहे. सदरच्या दाव्यावरून असे निदर्शनास येते की, अपिलार्थीनी विद्युत लोकपाल (मुंबई) न्यायासनाकडे मागितलेली दाद न्यायप्रविष्ठ आहे.

८. प्रतिवादी २ यांनी नमुद केले की, अपिलार्थीनी दाखल केलेली तक्रार खरी नसून वस्तुस्थिती दडवून ठेऊन केलेली आहे. प्रतिवादी महावितरण फलटण विभागाने गट क्रं.२५३ या मिळकतीवर असलेल्या विहीरीवर वीज जोडणी दिली आहे. गट क्रं.२५३ या मिळकतीच्या ७/१२ वर श्री. अंकुश कृष्णा पवार यांचे खाते नं. ३८२ वर विहीरीची नोंद आहे. सदरची विहीर अपिलार्थी व प्रतिवादी २ श्री. अंकुश कृष्णा पवार यांनी गट क्रं.२५३ या मिळकतीवर खणलेली आहे. अपिलार्थीने मिळकतीबाबत वस्तुस्थिती दडवून ठेवलेली आहे. वादातीत विहीर गट क्रं.२५४ मध्ये नसून गट क्रं.२५३ मध्ये आहे. अपिलार्थी यांनी विहिरीची नोंद गट क्रं.२५३ या मिळकतीच्या ७/१२ वर करून घेतलेली आहे. प्रतिवादी २ यांनी विहिरीवर घेतलेले वीज जोडणी ही कायदेशीर मार्गाने घेतलेली आहे, त्यामुळे ती खंडीत करण्याचा प्रश्नच येत नाही.

प्रतिवादी २ हे कायदेशीर हक्क व अधिकाराने विहिरीवरील पाण्याचा उपसा करत होते व आजही करत आहेत. याबाबतचे प्रकरण हे दिवाणी न्यायालय कनिष्ठस्तर खंडाळा यांचे न्यायालयात रे.दि.मु.नंबर १५४/२०२३ हे प्रलंबित आहे.

९. अपिलार्थीची तक्रार ही त्यांच्या वीज जोडणीबाबत नसून ती प्रतिवादी २ यांच्या वीज जोडणीबाबतची आहे. ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६/२०२० च्या कलम २.१(इ) अंतर्गत 'गाऱ्हाणेची' व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

> *"'गाऱ्हाणे' म्हणजे एखादया वितरण परवानेधारकाने, परवाना, कंत्राट, करारान्वये किंवा आयोगाने विनिर्दिष्ट केलेल्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात पार पाडण्यासाठी स्विकारलेल्या कामगिरीचा दर्जा, स्वरुप, ती पार पाडण्याची पध्दत यामधील कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा; ज्यात इतर बाबींबरोबरच (अ) जीवाला किंवा मालमत्तेला धोका ठरू शकणाऱ्या वितरण यंत्रणेची सुरक्षितता आणि (ब) आयोगाच्या कोणत्याही आदेशाचे पालन न करने किंवा त्या अनुषंगाने करावयाची कोणतीही कार्यवाही, जी मंच किंवा विद्युत लोकपालांच्या जसे असेल तसे, अधिकारक्षेत्रात येत असेल, त्याबाबतचे गाऱ्हाणे, यांचा समावेश होतो."*

तसेच वीज अधिनियम कायदा, २००३ मधील खंड १, कलम १५ नुसार 'ग्राहकाची' व्याख्या खालीलप्रमाणे आहे.

> *"'ग्राहक' याचा अर्थ असा की, या कायद्यानुसार अथवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमानुसार ज्या इसमास त्याच्या स्वतःच्या वापराकरीता एखाद्या परवानाधारकाकडुन अथवा सरकारकडून अथवा जनतेस वीज पुरवठा करण्याचा व्यवसाय करणाऱ्या इतर कोणत्याही इसमाकडुन वीज पुरवढा करण्यात येतो अशी कोणतीही इसम, असा आहे व ज्या इसमाची परिवास्तू / जागा, एखाद्या परवानाधारकाच्या सरकारच्या अथवा यथास्थिती, अशा इतर इसमाच्या कामासह वीज मिळण्याच्या प्रयोजनाकरीता त्या त्या वेळी, संबधीत असेल अशा कोणत्याही इसमाचा समावेश होतो."*

वीज अधिनियम कायदा, २००३ प्रमाणे ग्राहकाची व्याख्या व ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६/२०२० गाऱ्हाणेच्या व्याख्येनुसार 'गाऱ्हाणेची' व्याख्या एकत्रीतपणे विचार करता ग्राहकाच्या वीज पुरवठा संहितेखाली किंवा वितरण परवानेधारकांच्या कामगिरीच्या मानकांच्या संदर्भात कोणताही दोष, अपूर्णता, त्रुटी किंवा अपुरेपणा; याबाबत गाऱ्हाणे नाही. त्यामुळे, दुसऱ्या पक्षकाराबाबत या क्षणी गाऱ्हाणे विनियमानुसार ग्राहक तक्रार निवारण यंत्रणेच्या कक्षेत बसत नाही.

१०. सदर तक्रारीबाबत अपिलार्थी विरूध्द प्रतिवादी २ यांच्यामध्ये सदर जागेबाबत दिवाणी न्यायालय क स्तर खंडाळा येथे दावा प्रलंबित आहे. ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६/2020 मधील कलम १९.२२ व १९.२५ नुसार विद्युत लोकपाल खालील अटीची पुर्तता करण्यात आली तर गाऱ्हाणे स्वीकारण्यात येईल.

*"१९.२२ (जी) कोणतेही न्यायालय, न्यायाधिकरण, लवाद अथवा अन्य कोणतेही प्राधिकरण यांच्यापुढे त्याच गाऱ्हाण्याच्या संदर्भात ग्राहकाचे अभिवेदन प्रलंबित नाही किंवा ते अश्या कोणत्याही न्यायालय, न्यायाधिकरण, लवाद अथवा अन्य कोणतेही प्राधिकरणाने यापुर्वीच हुकूमनामा किंवा निवाडा किंवा अंतिम आदेश पारित करण्यात आलेला नाही.*

*" १९.२५ जर अभिवेदन खालीलप्रमाणे असल्याचे आढळले तर प्रकरण कोणत्याही स्तरावर असले तरी विद्युत लोकपाल ते नाकारेल*

*(ए) क्षुल्लक, उपद्रवकारक, दुष्ट हेतूचे;*

*(बी) पुरेसे कारण नसलेले ;*

*(सी) ग्राहकाला सकृतदर्शनी कोणतीही हानी किंवा नुकसान भरपाई किंवा गैरसोय झाली नसल्यास; किंवा"*

११. मंचाने त्यांच्या दिनांक १७ जानेवारी २०२४ रोजीच्या आदेशात या सर्व बाबींचा योग्य तो उहापोह केला आहे. त्यामुळे मंचाने जारी केलेल्या आदेशात फेरफार वा हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही. सबब, मंचाचे आदेश कायम ठेवण्यात येत आहेत.

१२. अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येत असून निकाली काढण्यात येत आहे.

सही/-
वंदना कृष्णा
विद्युत लोकपाल (मुंबई)